जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

गुरुवार दि.२१ नोव्हेंबर २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०२ अंक : ७५

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


## माझ्याकडे १ पैसाही सापडला नाही

# नालासोपारा येथील घटनेमागे भाजपचा कोणताही नेता नाही, तावडेंनी फेटाळला विरोधकांचा आरोप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी बुधवारी नालासोपारा येथे घडलेल्या घटनेमागे कोणतेही कट कारस्थान नसल्याचा दावा केला आहे. काल मी नालासोपारा येथे जाणार असल्याची माहिती भाजपच्या कोणत्याही नेत्याला नव्हती. मी अचानक तिथे गेलो होतो. त्यामुळे त्या घटनेमागे काही कारस्थान असल्याचा आरोप चुकीचा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

विनोद तावडे यांना मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये कथितपणे पैसे वाटताना पकडण्यात आले होते. त्यानंतर खासदार संजय राऊत यांच्यासह अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांनी ही घटना भाजपच्याच अंतर्गत राजकारणातून घडल्याचा दावा केला होता. तसेच या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला होता. या पार्श्वभूमीवर विनोद तावडे यांनी बुधवारी आपला मताधिकार बजावल्यानंतर आपली बाजू स्पष्ट केली.

विनोद तावडे म्हणाले, मी नालासोपारा इथे जाणार हे भाजपमधील कोणत्याच नेत्याला ठावूक नव्हते. कारण, वाड्याहून परत येताना मी उमेदवार राजन नाईक यांना फोन केला. त्यांच्याकडून मतदारसंघातील स्थितीची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी मी कार्यकर्त्यांसोबत असल्याचे सांगितले. तसेच मला चहासाठी येण्याचीही विनंती केली. मला वाटले तिथे १०-१२ जण असतील असा विचार करून तिथे गेलो.

त्यामुळे यात कुणाचेही कट कारस्थान नाही. आपसातील वाद नाही किंवा इतर कोणतेही कारण नाही. माझ्या मते, विरोधी पक्षांना आपला पराभव डोळ्यापुढे दिसत असल्यामुळे त्यांनी एका राजकीय घटनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. पोलिस किंवा निवडणूक आयोगाला काहीच मिळाले नाही. त्यानंतरही असे म्हणणे हे चुकीचे आहे. माझ्याकडे एक पैसाही सापडला नाही. त्यामुळे हे प्रकरण दाबण्याचा प्रश्नच येत नाही, असे ते म्हणाले.विनोद तावडे यांनी यावेळी आपल्यावर विश्वास दाखवल्याबद्दल शरद पवारांचेही आभार मानले. शरद पवार एक समंजस नेते आहेत. ते खूप ज्येष्ठ आहेत. ते मला खूप जवळून ओळखतात. त्यामुळे असा प्रकार मी करू शकत नाही हे त्यांना चांगलेच ठावूक आहे, असे ते म्हणाले.



ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या कॅशकांडामागे राज्याचे गृहमंत्री अर्थात देवेंद्र फडणवीस असल्याचा आरोप केला आहे. याविषयी पत्रकारांनी पुन्हा एकदा विनोद तावडे यांना छेडले असता त्यांनी संजय राऊत खोटे बोलत असल्याचा दावा केला. संजय राऊत खोटे बोलत आहे. चुकीचा दावा करत आहेत. मी तिथे जाणार आहे हे केवळ मलाच माहिती होते. केवळ २ मिनिटांत हा कार्यक्रम ठरला होता. माझे तिथे जाणे अचानक झाले. त्यामुळे या आरोपांत कोणतेही तथ्य नाही, असे तावडे म्हणाले.

विनोद तावडे यांनी यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या निवडणुकीत बिटकॉईन वाटपाच्या मुद्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, माझ्या मते ज्या गोष्टी आपल्याला माहिती नाहीत, त्या ऑथेंटिक गोष्टी आमच्या सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितल्या आहेत. सुधांशु त्रिवेदी ठोस माहिती असल्याशिवाय पत्रकार परिषद घेत नाहीत. सुप्रिया सुळे यांनी आपले म्हणणे मांडले आहे. त्यांनी चौकशीची मागणी केली आहे. पुढे चौकशी होईल व त्यातून वस्तुस्थितीही समोर येईल.सुप्रिया सुळे यांनी काल माझ्याविषयी काल माझ्याकडे ५ कोटी असल्याचे खोटे विधान केले. परंतु माझ्याकडे एक पैसा मिळाला नाही. त्यामुळे सुप्रिया सुळेंनी माझे ५ कोटी मला परत करावे, असेही विनोद तावडे यावेळी बोलताना म्हणाले.बहुजन विकास आघाडीच्या आरोपानुसार, भाजप सरचिटणीस विनोद तावडे मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये आले होते. त्यांच्यासोबत भाजप उमेदवार राजन नाईक व भाजपचे काही पदाधिकारी होते. ते तिथे पैसे वाटत होते. त्यावेळी बविआचे काही कार्यकर्ते हॉटेलमध्ये आले. त्यानंतर तिथे प्रचंड राडा झाला. हा प्रकार समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी झाली. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल होत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत पुण्यातील माजी पोलीस अधिकारी रवींद्र पाटील यांच्या आरोपाने खळबळ उडाली. रवींद्र पाटील यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर निवडणुकीत परकीय चलन वापरल्याचा व अनेक आर्थिक व्यवहारांसाठी बिटकॉइनचा वापर केल्याचा आरोप केला. भाजपा खासदार व प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी मंगळवारी रात्री एका पत्रकार परिषदेमध्ये हा आरोप केला. तसेच यासंबंधीची कॉल रेकॉर्डिंग व व्हॉट्सएप चॅट्सचे स्क्रीनशॉटही दाखवले. भाजपाच्या या आरोपांनंतर सुप्रिया सुळेंनी आपल्यावरील आरोप फेटाळलेत. शरद पवारांनीही हे आरोप जोरकसपणे फेटाळून लावलेत.



स्वाभिमान कुठेही न गहाण टाकता अभिमानाने लोकशाही बळकट करण्यासाठी कर्तव्य बजावले... वर्ष भर कुठेही हिंडल तरी मतदान हा आपला अधिकार आहे. आणि तो आपण गाजवला पाहिजे....

आज फुकटची दारू पाजणारे खूप भेटतील पण उद्या तुमच्या आमच्या मदतीला धावून येणारा व सविधानिक विचाराने चालणाऱ्या योग्य माणूस निवडा, तुमचे एक मत नक्कीच बद्दल घडवू शकतो.. हे ही तितकेच महत्त्वाचे....

**ज्ञानेश्वर बुधवत**
**एक मतदार**

# पं.जवाहरलाल नेहरु यांचे भारत स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्या नंतर देशासाठी मोठे योगदान-गुणवंत मिसलवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

आपला भारत देश ब्रिटीशांच्या जोखडात असताना १९१२ मध्ये राष्ट्रपिता म. गांधी यांच्या विचारावर प्रभावित होऊन सरळ राजकारणात उडी घेऊन स्वातंत्र्य संग्राम चळवळीत ९ वेळा जेल भोगून पंडीत जवाहरलाल मोतीलाल नेहरु यांचे भारत देश स्वातंत्र्यासाठी व स्वातंत्र्यानंतर देशासाठी मोठे योगदान होते असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १४ नोव्हेंबर २०२४ गुरुवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता आधुनिक भारताचे शिल्पकार, भारतरत्न, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांची १३५ वी जयंती



बालदिन (चिल्ड्रन्स डे) म्हणून हर्षोल्हासात साजरी करण्यात आली, यावेळी ते बोलत होते.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, भारत देश सक्षमीकरणासाठी आपल्या १७ वर्षे पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात नऊ आंतरराष्ट्रीय देशांचा अभ्यास दौरा करुन लोकतंत्र मजबूत करणे, देशाची अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना, कृषी, उद्योगात प्रगती, मोठ्या कारखान्यां साठी मदत, ३८ कोटी लोकसंख्येच्या काळात आपल्या ७५ वर्षांच्या आयुष्यात संवैधानिकरित्या धर्मनिरपेक्ष त्यांचे कार्य होते, असेही ते शेवटी यावेळी म्हणाले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, आगार लेखाकार सतीश गुंजकर, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, पाळी प्रमुख गिरीश कुलकर्णी, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, गुलाम रब्बानी, सुनीता हुंबे, प्रियंका खरात, वैष्णवी गंदेवार, कृष्णा पवार, सिद्धार्थ जोंधळे, संगीता वाघमारे, संजय मंगनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# कवळे गुरुजी यांनी मूळ सिंधी गावीआज मतदानचा हक्क बजावला



**नायगाव विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी आज आपल्या मूळ सिंधी गावी मारोतराव कवळे गुरुजी यांनी मतदानाचा हक्क बजावला. महाराष्ट्राला स्थिर व सक्षम सरकार देण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे.**

## लोकनेताचा सल्ला (जनहितास्तव)



झाले इलेक्शन
आता जपा रिलेशन
निवडणूक संपली
आता मैत्रीच्या पक्षात या
कारण गेल्या एका
महिन्यापासून मित्रांस
मित्रांसोबत बंडखोरी
झाली होती आता
मित्रांशी आघाडी युती
करा..
हेच आपले मैत्रीच
राजकारण होय....

# इंदिरा गांधी ह्या भारत देशाच्या सामाजिक व राजकीय महान राष्ट्रीय नेत्या-गुणवंत मिसलवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

वयाच्या आकराव्या वर्षापासूनच भारत देशसेवेचे ध्येयवेड्या असलेल्या व विविध मंत्रीपदावर राहुन भारत देश समृद्धीसाठी कार्य करणार्या सामाजिक व राजकीय राष्ट्रीय महान नेत्या म्हणजेच माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी ह्या होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १९ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता आयर्न लेडी, भारतरत्न, तिसर्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांची १०७ वी जयंती राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

सर्वप्रथम आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा.श्री. विष्णूकांत हारकळ व श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांच्या प्रतिमेचे



पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, इंदिरा गांधी यांनी आपल्या १५ वर्षे पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात ४१ आंतरराष्ट्रीय देशांचा सामाजिक अभ्यास दौरा करुन भारत देश विकसीत करण्यासाठी फॅक्ट्री कामगार बजेट, हरित क्रांती, शेतकर्यांसाठी बजेट, बँकांतील पैशांचे राष्ट्रीयीकरण करुन विनियोग, गरीबी हटाव चा नारा असे एक ना अनेक विधायक मोठे कार्य त्यांनी केले. अशा या थोर व्यक्तीमत्त्व नेत्यांचा आदर्श घेऊन आपण सर्वांनीच देशाप्रती, समाजाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा (शपथ) चे वाचन करुन सामूहिकरित्या कामगार- कर्मचार्यांना शपथ दिली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णूकांत हारकळ, श्रीनिवास रेणके, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वाहतुक नियंत्रक सुनील मोरे, आनंदा कंधारे, राजेश कांबळे, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजरमकर, सुनीता हुंबे, श्वेता तेलेवार, संगीता वाघमारे, मनिषा कदम, वैष्णवी गंदेवार, प्रियंका खरात, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे, श्रीकांत अंकुशे, चालक राहुल लांडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी, बंधु- भगिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघांमध्ये ७०% मतदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

२४ सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात दि. २० रोजी मतदान पार पडले. या मध्ये एकूण ३ लाख २२ हजार ९९५ मतदार असून त्यापैकी १,५४,३९३ स्त्रिया आहेत तर १,६८,६०१ पुरुष असून १ तृतीय पंथी अशी आकडेवारी आहे.

दि. २० रोजी मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून मतदारसंघामध्ये १,०७,७८६ स्त्रिया, १,१९,०१८ पुरुष तर १ तृतीय पंथी इतक्या मतदारांनी मतदान केंद्र आहे.



३,२२,९९५ मतदारांपैकी २,२६,८०५ मतदान झाले आहे. त्याची टक्के वारी पुढील प्रमाणे स्त्रिया ६९.८१%, पुरुष ७०.५९% , तृतीय पंथी १००% इतके मतदान झाले आहे. २४ विधानसभा मतदारसंघात संपूर्ण मतदान हे ७०.२२% झाल्याची माहिती प्रा. संजय खडसे निवडणूक निर्णय अधिकारी, २४- सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघ यांनी दिली आहे.

## दरबार ए शायरी

संविधान की महीमा न्यारी
दूर करेगा विपदा सारी !
पर है शर्त के सोच हमारी
मानवीय और होय विचारी !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे, ॲडव्होकेट, चिखली.

**झाडे लावा झाडे जगवा**

# उद्योगनगरी व तीर्थक्षेत्र रांजणगाव गणपती येथे शांततेत ७०%मतदान पूर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । विवेकानंदफंड**


पुणे जिल्ह्यातील शिरूर आंबेगाव विधानसभा १९६ क्षेत्रातील गाव रांजणगाव गणपती.ता.शिरूर येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव गणपती या ठिकाणी शांततेत पार पडले. एकूण ८२४२ मतदानासाठी सहा बूथ असताना देखील बूथ वर सायंकाळपर्यंत गर्दी दिसून येत होती व रांगेतून मतदान पूर्ण झाले, मतदान केंद्रावर प्रशासनातर्फे चोख पोलिस बंदोबस्त असल्याने शांततेत व एका रांगेत मतदान प्रक्रिया पार पडली.विशेष म्हणजे या मतदान केंद्रावर महिलांना सन्मानजनक प्रथम मतदानासाठी प्राधान्य दिल्याचे दिसून आले.

रांजणगाव गणपती मध्ये एकूण ८२४२ मतदारांपैकी ५७९२ मतदारांनी आपला हक्क बजावला असून सरासरी ७०.२७% टक्के मतदान या मतदानकेंद्रावर पार पडले.



## संपादकीय..

# मराठवाड्यात निष्ठेची परीक्षा



मराठवाड्यासाठी यंदाची विधानसभा निवडणूक खूप वेगळी आहे. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभेची निवडणूक वेगवेगळ्या मुद्द्यावर लढविली जाते. तसे पाहिले तर मराठवाड्यासाठी महायुतीने भरभरून योजना दिल्या. त्या योजनांची उतराई करण्यासाठी मराठवाड्यातील मतदार महायुतीच्या बाजूने उभा राहतो की, पुन्हा लोकसभेप्रमाणे महाविकास आघाडीच्या पारड्यात मते जातील हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. प्रामुख्याने महायुती व महाविकास आघाडी या दोघांमध्ये राज्यात लढत होत आहे. प्रत्यक्षात मात्र मराठवाड्यात सहा पक्षाचे वेगवेगळे उमेदवार, बंडखोर तसेच इतर अपक्ष व अन्य छोट्या–मोठ्या पक्षांच्या उमेदवारांच्या लढती लक्षवेधक आहेत.

लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात भाजपाला म्हणावी तशी साथ मतदारांकडून मिळाली नाही. त्यावेळची परिस्थिती व सध्याच्या विधानसभा निवडणुकीतील परिस्थिती खूप वेगळी आहे. त्यामुळे विधानसभेत मराठवाडा कोणाच्या बाजूने उभा राहील, यावर मराठवाड्यातील मतदारांची निष्ठाच राजकीय पक्ष तपासणार आहेत, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अजित पवार यांनी देखील मराठवाड्यात विविध ठिकाणी सभा घेतल्या. महायुतीतर्फे घेतलेल्या जाहीर सभेत मराठवाड्यातील पाणीप्रश्न सोडविणार असल्याची ग्वाही अनेक नेत्यांनी दिली. मराठवाड्याच्या दृष्टीने ही खूप समाधानकारक बाब मानता येईल. देशाच्या पंतप्रधानांपासून राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वच नेत्यांनी मराठवाड्याच्या कळीच्या मुद्द्यावर हात घातला. येथील मतदारांना भावनिक साद घातली. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विकासाच्या बाबी कमी; परंतु एकमेकांवर आरोप–प्रत्यारोपाच्या फैरी जास्त झाडण्यात आल्या. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पंतप्रधानांपासून उपमुख्यमंत्र्यांपर्यंत तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीतही अनेकदा खालच्या पातळीवरची टीका केली; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दोन सभा मराठवाड्यासाठी फलदायी ठरतील असे चित्र दिसत आहे.मराठवाड्यासाठीचा वॉटर ग्रीड प्रकल्प मार्गी लावल्याचे पंतप्रधानांनी जाहीर सभेत सांगितले. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील या प्रकल्पामुळे मराठवाडा सुजलाम सुफलाम होईल, अशी ग्वाही दिली. मराठवाड्यातील पाणी प्रश्नासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. वैतरणा आणि उल्हास खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी मिळणार असल्याचे सत्ताधाऱ्यांकडून सांगितले जात आहे. दुसरीकडे काँग्रेसचे राहुल गांधी तसेच अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विकासात्मक मुद्द्यावर बोलण्याऐवजी केवळ सत्ताधारी व पंतप्रधानांवर टीका करण्यात मोठेपणा समजला. कर्नाटक व तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रातही महालक्ष्मी योजनेद्वारे महिलांना दर महिना ३००० रुपये देण्याची घोषणा काँग्रेसने केली. तसेच बेरोजगारांना नोकरी देण्याचे आश्वासनही दिले.

अडीच लाख तरुणांना रोजगार उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही काँग्रेसचे राहुल गांधी यांनी मराठवाड्यातील सभांमध्ये दिली. एकीकडे लोकसभा निवडणुकीत बसलेला फटका व झालेली पीछेहाट भरून काढण्यासाठी महायुती प्रयत्नशील आहे, तर लोकसभेमध्ये मतदारांनी महाविकास आघाडीला दिलेली पसंती यंदाच्या विधानसभा निवडणुकीत कायम राहील का? याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष आहे. मराठवाड्यातील मतदारांची निष्ठा कोणाकडे आहे, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. लोकसभा निवडणुकीच्या काळात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे यांनी मतदारांची मानसिकता वेगळीच बनविली होती; परंतु आता मराठवाड्यात तो फॅक्टर विधानसभा निवडणुकीपुरता तरी संपल्यात जमा आहे. त्यामुळे मतदार मतदान करत असताना लोकसभा निवडणुकीची मानसिकता ठेवणार नाही, असे चित्र दिसून येत आहे. विकासाच्या मुद्द्यावर तसेच उमेदवाराचा चेहरा पाहून यंदाची विधानसभा निवडणूक मराठवाड्यात तरी काम करेल, असे मानले जात आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथे मतदार कोणाच्या बाजूने उभे राहतील, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. या ठिकाणी हिंदू जिंकणार की मुस्लीम याबद्दल सर्वच मतदारांच्या मनात धाकधूक आहे.छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, धाराशिव, लातूर या सर्वच जिल्ह्यात तुल्यबळ लढती होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची छत्रपती संभाजीनगर येथे झालेली सभा मराठवाड्यासाठी विकासाची नांदी देणारी ठरली.पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षवेधी सभा एमआयएमची हवा काढण्यासाठी पुरेशी ठरली. या ठिकाणी हिंदू विरुद्ध मुस्लीम असे वातावरण तापलेले आहे. याबरोबरच मराठवाड्यात एकनाथ शिंदे यांची शिवसेना की उद्धव ठाकरे यांची शिवसेना खरी आहे, याचाही निकाल मतदार देतील. छत्रपती संभाजी नगरात कोण वरचढ राहील? हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. बीड, धाराशिव तसेच हिंगोली जिल्ह्यात मतदारांची पसंती भाजपाला राहणार की शरद पवारांसोबत? याकडे मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. याबरोबरच उद्धव ठाकरे की एकनाथ शिंदे, कोणती शिवसेना जास्त मते घेईल हे देखील या निवडणुकीतून ठरणार आहे. मराठवाड्यात काँग्रेसची असलेली स्थितीही विधानसभेची निवडणूक अधोरेखित करणार आहे.मराठवाड्यातील ४८ जागांवर २०१४ व २०१९ मध्ये भाजपाचे आमदार सर्वात जास्त होते. २०१४ मध्ये भाजपाचे मराठवाड्यात १५ आमदार होते, तर २०१९ मध्ये भाजपाचे १६ आमदार होते. त्या पाठोपाठ २०१४ मध्ये शिवसेनेचे ११ व नंतर २०१९ मध्ये शिवसेनेचे १२ आमदार होते. त्यानंतर काँग्रेसचे नऊ व आठ, राष्ट्रवादीचे आठ व पुन्हा २०१९ मध्ये आठ, एमआयएमचा २०१४ मध्ये एकमेव आमदार होता. त्यानंतर शेकाप, रासप या दोन्ही पक्षांचे एकेक आमदार २०१९ मध्ये मराठवाड्यातून निवडून आले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र ३५ विधानसभा मतदारसंघात महायुतीचे मताधिक्य घटले. यामागे विविध कारणे आहेत. असे असले तरी, मराठवाड्यातील सर्व पक्षातील तसेच अपक्षांचे, बंडखोरांचे भवितव्य २० नोव्हेंबर रोजी ठरणार आहे.

# आपलं भलं कशात?

लवकरच नवी, पंधरावी महाराष्ट्र विधानसभा अस्तित्वात येईल. सरकार एकदाचं काम करू लागेल आणि आणि सारं कसं शांत होईल. आपण सगळे पुन्हा पाच वर्षांनी जागे होऊ. असंच घडणार असेल, तर नागरिक/ मतदार म्हणून आपलं कुणीच भलं करू शकणार नाही. मावळत्या विधानसभेच्या काळात (२०१९–२४) नेत्यांच्या वर्तणुकीतून, त्यांचं मतदारांना गृहीत धरणं आपल्या ध्यानात आलं आहे. त्यातून आपणही धडा घेतला असेल तर शांत राहाणं परवडणार नाही. नव्या विधानसभेच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींकडे आपण नेमके कोणते आग्रह धरायला हवेत ते समजून घेऊया.

चौदाव्या विधानसभेची १२ अधिवेशनं झाली. यात सर्व २८८ आमदारांकडून तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी सूचना मिळून एकूण पाच हजार ९२१ प्रश्न उपस्थित झाले. म्हणजे एका मतदारसंघातून पाच वर्षांत विचारले गेले सरासरी २०, म्हणजे वर्षातून फक्त ४ प्रश्न. किती किरकोळ! चौदाव्या विधानसभेने २०२० च्या पावसाळी अधिवेशनात महिलांवरील अत्याचारांच्या विरोधात तातडीने कठोर शिक्षा करण्याची तरतूद असलेलं शक्ती विधेयक मंजूर केलं होतं. पण सरकारने केंद्रीय गृह खात्याकडून ते शेवटपर्यंत मान्य करून घेतलं नाही. निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना आणणाऱ्यांनी महिला सुरक्षेसाठी किमान हा कायदा तरी मंजूर करून घ्यायला हवा होता.

विधानसभेत रोजचा प्रश्नोत्तर तास महत्त्वाचा. पाच वर्षांत महिलांच्या समस्यांवर ११९ म्हणजेच २.०१ टक्के प्रश्न विचारले गेले. लोकसंख्येत निम्म्या असलेल्या महिलांचा किती कमी विचार राज्याच्या सर्वोच्च वैधानिक संस्थेत होतो, ते पहा. विधानसभेत बालकांच्या प्रश्नांचं प्रमाण सन २०१४ पासून दोन–तीन टक्के राहिलं आहे. या विधानसभेत बालकांसंबंधी मांडले गेलेले एकूण प्रश्न १२९, म्हणजे २.१८ टक्के आहेत. आरोग्यावर, त्यातही आरोग्यसुविधांवर मांडलेले प्रश्न एकूण ४५१, म्हणजे सुमारे ७.५ टक्के, मागील विधानसभेपेक्षा हे प्रमाण दोन टक्क्यांनी जास्त. हा कोविडचा परिणाम. यावेळचे शालेय शिक्षणविषयक प्रश्न एकूण २५६, सुमारे ४.२ टक्के आहेत. आदिवासीविषयक प्रश्नांची संख्या १३८ म्हणजे जेमतेम २.२ टक्के. अल्पसंख्य समाजासंबंधीचे प्रश्न गेल्या वेळेपेक्षा एकने कमीच. फक्त नऊ. या प्रश्नसंख्येवरून आमदारांची उदासीनता लक्षात येते. ('संपर्क'कडे सर्व प्रश्नांची जिल्हानिहाय यादी आणि तपशील आहे.)

अधिवेशनांप्रमाणे महत्त्वाच्या असतात त्या विधिमंडळ समित्या. त्या वर्षभर काम करतात. त्यांच्या नियमित बैठका, राज्यभर दौरे असतात. समित्या प्रशासनाला सूचना देतात. सर्वपक्षीय आमदार समित्यांचे सदस्य असतात. या समित्या म्हणजे समस्या सोडविण्याचे महत्त्वाचे साधन असते. मावळत्या विधानसभेच्या पाच वर्षांच्या काळात विधिमंडळ समित्यांचं कामच झालं नाही. महाविकास आघाडीने सन २०२० साली नेमलेल्या समित्या कोविडकाळात काम करू शकल्या नाहीत. सत्ताबदलानंतर आलेल्या सरकारने या समित्या रद्द केल्या. नव्या नेमल्या नाहीत. 'संपर्क'ने महिला–बालकल्याण, अनुसूचित जाती–जमाती कल्याण, पंचायत राज यासारख्या काही विधिमंडळ समित्यांसोबत काम केले. कोविडकाळात आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रातली आव्हाने ठळक झाली आणि या दोन विषयांवर समित्याच नसल्याची उणीव जाणवली. सर्व विधिमंडळ समित्या पूर्ण काळ कार्यरत असल्या पाहिजेत आणि आरोग्य आणि शिक्षण या विषयांवर स्वतंत्र समित्या हव्यात.

गेल्या पाच वर्षांत विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती ही कळीची पदं बराच काळ रिक्त राहिली. जून २२ ते जुलै २३ या काळात मंत्रिमंडळात महिला नव्हती. अनेक असंवैधानिक घटना अनुभवायला मिळाल्या. महाराष्ट्राशी मविआ सरकार असताना केंद्राने केला तसा दुजाभाव राज्य सरकारने आमदारांशी केला. त्यांना प्रकल्पनिधी नाकारला, मंजूर कामांच्या निधीला स्थगिती दिली. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळेच संबंधित कामं मार्गी लागली. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी मंजूर कामावरचे स्थगिती आदेश घटनाबाह्य ठरवले गेले. सन २०२४ या एकाच वर्षांत एक अंतरिम आणि दोन अतिरिक्त अर्थसंकल्प मांडले गेले. पुरवणी मागण्यांच्या सर्वाधिक आकारमानाचा विक्रम या विधानसभेने केला. या विधानसभेतल्या २८८ आमदारांनी पाच वर्ष खर्च केलेल्या स्थानिक विकास निधीची माहितीच जाहीर झालेली नाही. 'संपर्क'ने याबाबत वित्त आणि नियोजन विभागाकडे वारंवार पाठपुरावा चालवला आहे.

या विधानसभेच्या कार्यकाळात आपण काय पाहिलं? पहाटेचा शपथविधी, पक्षफोडी, पळवापळवी, गट–तट, कथित भ्रष्टाचाराच्या परिणामांपासून स्वतःला वाचवण्यासाठी आमदारांनी 'महाशक्तिमान' पक्षाच्या वळचणीला जाणं, सदस्यांची पात्र–अपात्रता, पक्षचिन्हांवर हक्क हे मुद्दे अनिर्णित राहणं, तत्कालीन राज्यपालांचे निर्णय सर्वोच्च न्यायालयाने असंवैधानिक ठरवणं. आपण हे सारं फक्त बघत, चवीचवीने चघळ राहिलो. राग आला, वैफल्य वाटलं तरी संघटितपणे व्यक्त झालो नाही. सर्व पक्षबदलू आमदारांनी महाराष्ट्राच्या विकासासाठीच हे केलं, असा आव आणला. पक्ष बदलायला त्यांनी मतदारांची परवानगी घेतली होती का? ही चलाखी आपण नक्कीच ओळखली. तरीही, यातून जनतेचं काय भलं झालं, राज्याचा किती विकास झाला, हे आपण विचारलंच नाही. आता मात्र थंड राहून चालणार नाही.

आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची विधानसभा तयार होते. तिथे आपल्या वतीने कायदे करणं, धोरणं आखणं, कारभार हाकणं, राज्यातल्या जनतेची, दुर्बलांच्या कल्याणाची जास्त काळजी घेणं, ही घटनेने त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी, त्यांचा 'स्कोप ऑफ वर्क' आहे. ते आपल्याला उत्तरदायी असतात. भारतातल्या विधानसभांच्या कामाचे वार्षिक सरासरी दिवस ३१, तर लोकसभेचे ६८ इतके कमी आहेत. वर्षातून किमान शंभर दिवस तरी या संस्थांचं कामकाज व्हावं, अशी शिफारस व्यंकटचलय्या आयोगाने २००१ मध्ये केली आहे. तरीही, अधिवेशनांचे दिवस कमीच होत चालले आहेत. चौदाव्या विधानसभेचे पाच वर्षांतल्या कामकाजाचे दिवस १३१ आहेत. यावेळी कोविडचं निमित्त होतं. पण मागील विधानसभेने (२०१४–१९) पाच वर्षांतही फक्त १९८ दिवस काम केलं होतं. मानव विकास निर्देशांक कमी असलेले महाराष्ट्रात नऊ जिल्हे आहेत. गडचिरोली, वाशीम, नंदुरबार, धुळे, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, नांदेड आणि जालना. सभागृहात वर्चस्व मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर अशा विकसित शहरांचे असते. सर्व अविकसित भागातल्या मतदारांचा विकसित प्रदेशांतल्या मतदारांइतकाच सभागृहावर हक्क प्रस्थापित होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावेत.

नव्या विधानसभेत आपण आग्रह धरायला हवा की राज्यघटनेने सोपवलेल्या जबाबदारीची बूज राखून तिथलं कामकाज चालेल. एका वर्षात किमान शंभर, म्हणजे पाच वर्षांच्या कार्यकाळात किमान पाचशे दिवस अधिवेशनं होतील. बालक, महिला, आरोग्य, शिक्षण, आदिवासी, अल्पसंख्य हे विषय, अल्प माविनि जिल्ह्यातल्या समस्या यावरच्या चर्चेसाठी प्रत्येक अधिवेशनात वेळ राखून ठेवला जाईल. 'संपर्क'ने राज्यातल्या काही मतदारसंघात 'आमदार संवाद मंच' या नावाने नागरिकांचे गट बांधले. 'केशव गोरे ट्रस्ट' आणि 'उत्तरदायित्व फाउंडेशन' यांनी मुंबईतल्या काही उपनगरांमध्ये नागरिकांचे गट तयार करून निर्वाचित आमदारांच्या कामावर देखरेख करायचं ठरवलं आहे. यात सहभागी होण्याचं वाचकांना आमंत्रण. आपण नागरिकांचं कर्तव्य पार पाडूया आणि लोकप्रतिनिधींना त्यांचं काम करायला भाग पाडूया. यातच आपलं भलं असेल.

(लेखिका 'संपर्क' या संस्थेच्या सदस्य आहेत)

# का वाढला शेतकऱ्यांचा रोष?

जगातील सोयाबीनच्या एकूण उत्पादनातील सव्वातीन टक्के उत्पादन भारतात होते. त्यात मध्य प्रदेशनंतर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक येतो. शेती फायद्याची होण्यासाठीची सरकारची जबाबदारी मोठी. पण दुर्दैवाने राजकीय मंडळींनी शेतीकडे म्हणावे तेवढे लक्ष दिले नाही. त्यात कंत्राटदारी पायाभूत सुविधा निर्माण झाल्या आणि शेतमालाच्या भावाची अडचण कायम राहिली. काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात कांदा आणि आता सोयाबीनच्या दराचा विषय ऐरणीवर आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातही सोयाबीन केंद्रस्थानी आहे.

**का घटले उत्पादन?**

एका अभ्यासानुसार, जगात वर्षाला ३५ कोटी टन सोयाबीनचे उत्पादन होते. भारतात एक कोटी ते एक कोटी २० लाख टन सोयाबीनचे दर वर्षी उत्पादन होते. त्यात मध्य प्रदेशात सर्वाधिक ५५ लाख हेक्टरवर, तर त्याखालोखाल महाराष्ट्रात ४५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर अधिक सोयाबीनचे उत्पादन होते. मध्य प्रदेशात ५० ते ६० लाख टन, तर महाराष्ट्रात ४० ते ४५ लाख टन उत्पादन पावसाच्या परिस्थितीप्रमाणे होते. देशात तेलाची एकूण गरज दोन कोटी ४० लाख टन आहे. आपल्याकडे ७० टक्के तेलाची आयात होते. भारतात १९८४ मध्ये साडेपाच लाख तेलघाणे होते. त्यात सव्वा कोटी जणांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार मिळत असे. आज तेलघाण्यांची संख्या ११ हजार झाली आहे. प्रत्यक्षात साडेपाच हजार तेलघाणे सुरू आहेत. सद्यःस्थितीत आपण दीड लाख कोटी रुपयांचे तेल आयात करतो. तेलघाणे नष्ट होताना त्याकडे कुणीही लक्ष दिले नाही. तेलबिया उत्पादन, तेल उत्पादन, उत्पादनप्रक्रियेसाठी लागणारा खर्च, प्रत्यक्षात विक्री करताना ठरविलेली किंमत यातील तफावत याचे व्यस्त प्रमाण याविषयी विविध पातळ्यांवर दावे प्रतिदावे केले जातात. या सगळ्या टोलवाटोलवीत शेतकऱ्यांचे मात्र नुकसान होते, याकडे कुणाचेच लक्ष जात नाही.

**का वाढला शेतकऱ्यांचा रोष?**

केंद्र सरकारने २०२४–२५ या वर्षासाठी सोयाबीनला प्रतिक्विंटल ४८९२ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. प्रत्यक्षात ३२०० ते ३९०० रुपये दराने सोयाबीनची खरेदी सुरू असल्याचे अनेक ठिकाणाहून सांगितले जाते. हमीभावापेक्षा एक ते दीड हजार रुपये तफावत असल्याने शेतकऱ्यांतील रोष वाढला आहे. राज्यात ४५ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी होते. मागील २० वर्षांत सोयाबीन पिकाने मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाचे सर्वाधिक क्षेत्र व्यापले आहे. दर वर्षी ६० ते ७० लाख टन सोयाबीन उत्पादन काढणारे महाराष्ट्र देशातील प्रमुख राज्य आहे. जवळपास २५ हजार कोटी रुपयांची उलाढाल सोयाबीनशी निगडित आहे. विशेषत: अल्पभूधारक शेतकऱ्यांचे नगदी पीक म्हणून सोयाबीनकडे पाहिले जाते. नऊ ते अकरा हजार रुपये प्रतिक्विंटल दराने विकले जाणारे सोयाबीन साडेतीन हजार रुपये प्रतिक्विंटल दरापर्यंत घसरले आहे. त्यामुळे सोयाबीनचे अर्थकारण पूर्णत: विस्कळित झाले आहे. त्यावर मलमपट्टी करणाऱ्या योजना पुरेशा नसल्याचे चित्र सध्या तरी आहे.

**तीनच संस्थांची नेमणूक का?**

यंदा अतिवृष्टीचा फटकाही सोयाबीनला बसला आहे. पावसात भिजल्यामुळे सोयाबीनची प्रत अनेक भागांत खालावली आहे. अतिवृष्टी आणि हमीभाव असा दोन्हींकडून शेतकऱ्यांना फटका बसला आहे. सरकारने १३ लाख टन सोयाबीन खरेदी करण्याचे ठरवले होते. साधारण ३० ते ३५ संस्थांना त्याच्या खरेदीसाठी मान्यता दिली होती. प्रत्यक्षात खरेदीसाठी फक्त तीनच संस्थांची नेमणूक केली गेली. असे का झाले? यामागे कोण आहे? बाबूगिरीचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे का? असे असंख्य प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. जर नियोजनाप्रमाणे सोयाबीनची खरेदी केली गेली तर सोयाबीनला पाच हजारांच्या आसपास हमीभाव देता येऊ शकतो. सरकारने जाहीर केलेला दरही याच्या आसपासच आहे. मात्र यासाठी योग्य ती पावले उचलणे आणि इच्छाशक्ती प्रबळ करणे आवश्यक आहे; अन्यथा शेतकऱ्यांची पुन्हा निराशा होणार आहे.

# निराशेला निरोप

आनंदाचे डोही, आनंद तरंग, हे लता मंगेशकर यांनी गायलेले गाणे सकाळीच आकाशवाणीवर कानी पडायचे. तेव्हा आनंद म्हणजे काय याचा अर्थ लहानपणीच बालमनावर कोरला गेला. निसर्ग, अंगण, परिसर, झाडे, झुडपे, वेली, विहीरीत, तलाव, मंदिरे विस्तृत निळसर आकाश, चांदण्या, चंद्र, पशू–पक्षी, त्यांचे आवाज विविधरंगी फुलपाखरे, पिवळी चुटूक फुलपाखरे, पाहण्यास आनंद वाटे. आमच्या लहानपणी टीव्ही नव्हता, मैदानी खेळ खेळले जायचे, प्रत्येक घरावरचा, दुकानावरचा फलक वाचण्यात आनंद होई.

जीवन जगण्याची कला आपले कुटुंब, प्राथमिक, माध्यमिक शाळा येथेच शिकायला मिळते. खरे संस्कार इथेच होतात. बालपण हे निरागस असते. आईवडील, गुरू जे शिकवतात तेच खरे असते. भारताची प्रतिज्ञा, प्रार्थना मनःपटलावर अगदी खोल बिंबवले गेली. मोठी माणसे, देश यांच्याविषयी असणारा आदर, दरारा, कौटुंबिक आणि सामाजिक एकात्मकता यातूनच जपली जाते. सोबतच आकाशवाणीवरील भक्तिगीते, भावगीते, माजघरातील गप्पा, वनिता मंडळ बिनाका या कार्यक्रमांचा मनावर खोल परिणाम झाला. सध्या इतकी मनोरंजनाची माध्यमे असतानाही रेडिओच ऐकते आणि माझा रोजचा दिवस आनंदाने साजरा करते. पोस्टमनची वाट पाहणे हाही एक छंद होता. आलेली पत्रे पुन:पुन्हा वाचणे ही तर आनंदाची पर्वणी. काय सांगू तो शाब्दिक आनंदाचा सोहळा! स्वत:च्या हाताने केलेले पदार्थ दुसऱ्यांना खाऊ



घालणे हा तर अलौकिक आनंद. तसेच आपले भारतीय राष्ट्रीय सण, महाराष्ट्रीय सण ही अभिजात संस्कृती. यांचा आनंद घेणे, देणे, द्विगुणित करणे आनंद सोहळाच.

माझे आजोळ गणपती घाट, वाई येथे आहे. संध्याकाळ झाली की, मामा–मामी घाटावर पाठवायचे. तेथे रोज वसंत व्याख्यानमाला असायची. मी गेली सत्तेचाळीस वर्षे लेखन करते. याचे मूळ येथेच रुजले गेले. त्यातून अभ्यासू वृत्ती वाढली. आत्मविश्वास वाढला. कला, बुद्धी, वक्तृत्व, कर्तृत्व, दातृत्व ही गूढ चैतन्य तत्त्वं कधी कशी वाढत गेली समजलेच नाही.

पुढे लग्नानंतरही अक्षरे शब्द, वाक्यं खुणावत असत. दिसामाजी काहीतरी लिहावं, या उक्तीप्रमाणे गद्य असो की पद्य, रोज काहीतरी लिहीत असे. सर्व वह्या जपून ठेवल्या. माझे भाऊ चंद्रकांत गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पुस्तक काढू शकले. विविध पुस्तकांमध्ये लेखन करू शकले. आजारपण हा जीवनाचाच एक भाग. श्वसनसारखा गंभीर आजार, पाठदुखी, मधुमेह यांसारखे आजार असले तरी लिहीतच राहिले. आनंद वाढत गेला. लेखनाने जगायला शिकवले. वडील ३४ वर्षे वाचनालयाचे सदस्य होते. म्हणून लेखनाची, वाचनाची आवड लागली, वाढली. स्वतःच्या सामर्थ्यावर लिहिण्याचे भाग्य लाभले. हा नवनिर्मितीचा आनंद खूप वेगळा आहे. निराशेशी हस्तांदोलन करून निरोप दिला म्हणूनच आयुष्याचा टप्पा ओलांडून शकले.

ज्या समाजात आपला जन्म झाला त्या समाजाची सेवा करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे, ही भावना अनुवंशिकतेने माझ्याकडे आली. समाजाचे सगळे रूपडे शिक्षणाने बदलते. शिक्षणातून योग्य तेच घेतले म्हणून मनाचे सत्व प्रखर किरणांनी फुलून आले. अनेक गुण जोपासले.

येणाऱ्या क्षणांना सजवून चैतन्यशक्ती होऊ या. प्रत्येक क्षण जगण्यासाठीचा ध्यास घेऊ या. पडझड, धडपड जीवनात होतच असतात. आनंदाने, नव्या आशेने नवी स्वप्नं बघू या. या स्वप्नांमुळे नियोजन घडेल आणि त्यादिशेने केलेल्या प्रयत्नांमुळे सर्व काही साध्य होऊ शकेल. प्रत्येकाकडे काही ना काही आनंद देणारे असतेच. त्या कलेचा आनंद घेऊ आणि देऊही. आपोआपच जगण्याचा उत्सव झाल्याशिवाय राहणार नाही.

# पालकांनी मुलांच्या बाबत मित्रत्वाची भुमिका धारण करणं लाभकारी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

मुलांच हितं व्हावं हि पालकांची इच्छा असते हिच इच्छा पुर्णत्वास जाण्यासाठी मुलांच्या सोबत मित्रत्वाची भुमिका धारण करता आली पाहिजे.पाल्यांच्या हितासाठी पालकांनी मित्रत्वाची भुमिका धारण करावी जेणेकरून उभयतां साठी हितकारक ठरेल.विद्यमान पाल्य आणि पालक या उभयतांची सध्याची मानसिक स्थिती जर आपण पाहिली तर आपल्याला वैचारिक विरोधाभास प्रथम दर्शनी ठळकपणे नक्कीच दिसेल.जगातील जवळपास सर्वच पालक आपल्या पाल्याच्या भविष्या संदर्भात चिंतित असतात ते असणं स्वाभाविक असतं.मुलांनी खुप अभ्यास करावा खुप मोठं व्हावं,उच्च शिक्षित होऊन सुसंस्कारित व्हावं हि प्रत्येक पालकाची आई वडीलांची मनोमन इच्छा असते.त्या मागिल पार्श्वभूमी स्पष्ट असते आपल्या वाट्याला जे दुःख आलं ते आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये एवढीच प्रमाणिक अपेक्षा असते.आपण जो संघर्ष दुःख वेदना,भोगल्या त्या आपल्या पाल्यांच्या वाट्याला येऊ नयेत.याच प्रमाणिक भावनेने प्रत्येक पालक आपल्या पाल्यांना घडविण्यासाठी अहोरात्र धडपडत असतो.हि धडपड एकतर्फी ठरू नये हि पालकांची चिंता असते.आणि दुर्दैवाने असंच घडतं मुलांना याच फार गांभीर्या नसत हे वास्तव आहे.याच परिणाम पालक आणि मुलं यांच्या मध्ये कटुता निर्माण होतो.मुलाच्या भवितव्यासाठी चिंतित पालकांनी मधला मार्ग काढत आपल्या पाल्या सोबत मैत्री पुर्ण मार्गदर्शन करावं.मुलांचा पालक मालक या भुमिकेतुन बाहेर येऊन मित्राच्या भुमिकेत मार्गदर्शन केले म्हणजे ते मुलांना पण रूचेल आणि पचेल.ज्या पद्धतीच जसं युग असतं.तशी पिढी आचरण करत असते.त्या त्या युगाचा त्या त्या पिढीवर वैचारिक परिणाम जाणवत असतोच.सध्या तर चंचल अस कलयुग चालू आहे.आणि सोबत तंत्रज्ञान युगाचा प्रभाव आणि संस्कारांचा अभाव सगळीकडे प्रामुख्याने जाणवतं आहे.मुलांना घडविण्यासाठी त्यांना दडपणाखाली ठेवण्या ऐवजी मित्र म्हणुन समजावणं जास्त हितकारक ठरत.आपली मुल हि आपल्या अज्ञेत राहवीत शब्दात राहावीत अशी पालकांची मनोमन इच्छा असते.याच इच्छे पोटी प्रत्येक आई वडील पालक हे आपल्या पाल्यांनवर वेळोवेळी वेगवेगळ्या पद्धतीने नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असतात .पण हे नियंत्रण सध्याच्या मुलांसाठी जड जातंय.त्यांना नियंत्रण बंधनं नको असुन मुक्त संचार हवा आहे. नियंत्रण प्रस्थापित करण्याची आई वडील पालकांची भुमिका अगदी रास्त असते योग्य असते.पण मुलांना या विषयी फार गांभीर्य नसते हि शोकांतिका आहे. आपल्या मुलांच हित व्हाव एवढीच त्यांची प्रमाणिक इच्छा असते.याच सरळ साध्या आणि प्रमाणिक भावनेतून



आपले पालक आपल्यावर वेगवेगळ्या पद्धतीने दडपणाचा दबाव तंत्राचा वापर करत असतात.परंतु सध्याच्या काळातील मुलं हि तंत्रज्ञान युगातील असल्याने व सध्या संयम आणि सहनशीलता याचा सर्वदूर अभाव असल्याने स्व हिताचं पण जास्तीच बंधनं कोणालाही नको आहे.पुर्वी मुलं आई वडील पालक यांच्या आज्ञेबाहेर जाण्याचा स्वप्नात पण विचार करू शकत नव्हती. हल्ली परस्थिती खुप झपाट्याने बदलत चालली आहे.वेळेनुसार संस्कारांचा लोप होत चालला आहे.जीवन घडविणारेच हितशत्रू जाणवत आहेत.अशी भयानक स्थिती निर्माण होत असताना पालकांनी आपली चिंता वाढु न देता वेळेनुरूप आपल्या मध्ये थोडा बदल घडवून मुलांच्या कल्याणासाठी हितासाठी त्यांना मित्राच्या भुमिकेत मार्गदर्शन करावे. म्हणजे जेणेकरून मुलं पण घडतील आणि चिंता पण मिटेल पण असं सहसा होत नाही पालक पालकांच्या भुमिकेतुन बाहेर पडण्यासाठी तयार नाहीत.आणि पाल्यांना स्वतः हितासाठी योग्य असणारी आई वडील पालकांची भुमिका मुलांना अयोग्य वाटते.हे परस्पर विरोधी चित्र भयानक वास्तव आहे.स्व हित न समजणं या सारखं दुसरं दुर्भाग्य नसत. वेळ प्रसंग अवधानता पाहुण पालकांनी आपली रननिती बदलली पाहिजे.कारण सध्या ज्या पद्धतीने जीवनशैली आहे. त्या अनुषंगाने मुलांना मार्गदर्शन करताना आपण पालक म्हणून रागवण चिडण वेळ प्रसंगी मारहाण करणं उपयुक्त ठरण्यासारख नाही. तर मुलांना अगदी त्यांचा मित्र होऊन त्यांच्या सोबत योग्य संवाद ठेवून उचित मार्गदर्शन करणं सध्यातरी हितकारक आहे.हिच वेळेची आणि काळाची गरज आहे.



**–गणेश खाडे**
**विचारवंत, साहित्यिक, लेखक,**
**आध्यत्मिक मार्गदर्शक तथा संस्थापक**
**अध्यक्ष वंजारी महासंघ ९०११६३४३०१**

# काळा ठिपका

कॉलेजमधील एका प्राध्यापकाने एके दिवशी वर्गावर आल्यावर अचानक जाहीर केले–
आज मी तुमची सरप्राईज टेस्ट घेणार आहे.
असे म्हणून प्राध्यापकाने प्रत्येक विद्यार्थ्याला प्रश्न पत्रिका दिली. ती हातात पडताच जवळपास सर्व विद्यार्थी आश्चर्यचकित झाले. काहीजण तर पूर्ण बावचळून गेले. कारण प्रश्नपत्रिका पूर्ण कोरी होती. कसलेच प्रश्न त्यावर नव्हते. फक्त त्या पेपरच्या मध्यभागी एक छोटा काळा ठिपका होता.
प्राध्यापक म्हणाले,
आश्चर्य वाटून घेऊ नका. तुम्हाला पेपरवर जे काही दिसतंय त्यावर दहा ओळी लिहायच्या आहेत.
मुलांनी मग जमेल तसे उत्तर लिहिले. सगळ्याचे लिहून झाल्यावर प्राध्यापकाने पेपर गोळा केले आणि एकेकाची उत्तर पत्रिका मोठ्याने वाचायला सुरुवात केली.
कुणी लिहिले होते, तो ठिपका म्हणजे मी आहे, माझे जीवन आहे, तर कुणी भौगोलिक रित्या लिहिले होते की, पेपरच्या मध्यभागी एक काळा ठिपका आहे. त्याचा व्यास अमुक तमुक मिलीमीटर असावा वगैरे वगैरे !!!
सगळे झाल्यावर प्राध्यापक म्हणाले,
दुर्दैवाने तुम्ही सर्वजण नापास झालेला आहात.
सर्वजण दचकले.
मग प्राध्यापक सांगू लागले,
सर्वांनी एकाच दिशेने विचार केला आहे. सर्वांचा फोकस त्या काळ्या ठिपक्यावरच होता. ठिपक्या भोवती खूप मोठा पांढरा पेपर आहे हे मात्र कुणीच लिहिले नाही...
आपल्या जीवनात देखील असेच होते. आपल्याला खरेतर जीवनरुपी खूप मोठा पांढरा पेपर मिळालेला असतो. ज्यात आनंदाचे रंग किंवा शब्द भरायचे असतात. पण आपण ते न करता केवळ काळ्या ठिपक्या कडे पाहतो.
जीवनातल्या अडचणी, मित्र मैत्रिणी सोबतचे वाद गैरसमज, घरातील विसंवाद हे सगळे ते काळे ठिपके असतात. आपण त्यावर फोकस करतो आणि खूप मोठा पांढरा पेपर हातात आहे याकडे दुर्लक्ष करतो.खरेतर एकूण पांढऱ्या पेपरच्या आकारापेक्षा तो काळा ठिपका तुलनेने खूप लहान असतो. पण तरी आपण त्यातच गुंतून पडतो. आणि मोठा पांढरा भाग दुर्लक्षित राहतो. म्हणून यापुढे एक लक्षात ठेवा. काळा ठिपका न पाहता पांढरा पेपर पाहायला शिका!!!
**खूप समाधानी व्हाल!**

**संकलन – आनंद महाजन.**
**योग प्रशिक्षक, अमरावती.**
**९४२२९४९५६४.**

# नवीन बालहक्क धोरण निर्मिती

२० नोव्हेंबरला जागतिक बालदिन असतो. भारतात मात्र १४ नोव्हेंबरला बालदिन साजरा करतात. जागतिक पातळीवर दरवर्षी २० नोव्हेंबरला बालदिन उर्फ चिल्ड्रन्स डे साजरा केला जातो. सन १९५९ सालापर्यंत बालदिन ऑक्टोबर महिन्यात असायचा. सन १९५४मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ठरवल्यानुसार पहिल्यांदाच बालदिन साजरा झाला. लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्मांबाबतचे सामंजस्य वाढावे तसेच बालदिन साजरा करण्यामुळे जगभरातल्या मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना रुजावी, असाही हेतू यामागे होता. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की सन १९५९मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने बालहक्कांची सनद-४ डिक्लरेशन ऑफ चिल्ड्रन्स राइट्स स्वीकारली. शिवाय सन १९८९मध्ये याच दिवशी बालहक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ राष्ट्रांनी मान्य केले आहेत. सर्वांत पहिला बालदिन ऑक्टोबर १९५३मध्ये जगभर साजरा करण्यात आला. यासाठी जिनीव्हाच्या आंतरराष्ट्रीय बालकल्याण संघटनेचा पुरस्कार लाभला होता. त्यानंतर कै.श्री.व्ही.के.कृष्णमेनन यांनीही आंतरराष्ट्रीय बालदिनाची संकल्पना उचलून धरली व सन १९५४मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ती स्वीकारली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने ठरवल्यानुसार २० नोव्हेंबर हा जागतिक बालदिन मानला जातो. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्मांबाबतचे सामंजस्य वाढवावे तसेच जगभरातल्या मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे, असा हेतू यामागे होता. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे भारतात मात्र माजी पंतप्रधान पंडित नेहरूजी यांच्या जन्मदिवशी म्हणजे १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. पंडित नेहरूजींना मुलांविषयी वाटणार्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा हा मार्ग आहे. बालकांनाही आयुष्याचा आनंद घेण्याचा मौजमस्ती करण्याचा हक्क आहे आणि या मुलांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित आणि मनाने व शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या आपल्या नशीबवान मुलांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याबाबतची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांच्या मनात रुजवली तर भारताचे भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतीलच शिवाय कायमच वंचित आणि नकारात्मक जगणे वाट्याला आलेल्या एखाद्या दुर्दैवी बालकालाही आपल्या या प्रयत्नांमुळे चांगले आयुष्य मिळू शकेल.

बालदिन साजरा करताना आपण अर्थातच चाचा नेहरूजींचे त्यामागील विचार समजून घ्यायला हवेत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधीही मोठ्या प्रमाणात मिळाल्या पाहिजेत. बालदिनाच्या निमित्ताने आपणांपैकी प्रत्येकाला मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याबाबतच्या आपल्या वचनबद्धतेची आठवण राहते. भारताच्या प्रदीर्घ स्वातंत्र्य लढ्यानंतरचे पहिले पंतप्रधान होते पंडित नेहरू. बालकांविषयी पंडित नेहरूजींना वाटणार्या प्रेमाची आठवण म्हणून १४ नोव्हेंबर हा त्यांचा जयंतीदिन आपल्या देशात बालदिनाच्या रूपाने साजरा केला जातो. भारतातील सर्व बालकांच्या वास्तविक मानवी हक्कांवर पुनर्विचार करण्यासाठी दरवर्षी २० नोव्हेंबर रोजी बाल हक्क दिन साजरा केला जातो. लोकांना त्यांच्या मुलांच्या सर्व हक्कांबद्दल जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारे दरवर्षी या दिवशी राष्ट्रीय असेंब्लीचे आयोजन केले जाते. २० नोव्हेंबर हा दिवस जगभरात जागतिक बालदिन वा आंतरराष्ट्रीय बाल हक्क दिन म्हणूनही साजरा केला जातो. भारतासह आंतरराष्ट्रीय समुदायाचे सदस्य बाल हक्कांच्या पुनर्मूल्यांकनासाठी विविध कार्यक्रम आयोजित करून जगभरात हा दिवस साजरा करतात. बालकांच्या हक्कांनुसार बालपणात बालकांना कायदेशीर संरक्षण, काळजी आणि संरक्षण देणे अर्थात त्यांची शारीरिक आणि मानसिक अपरिपक्वता प्रदान करणे अत्यंत आवश्यक आहे. २० नोव्हेंबर २००७ रोजी १९५९ साली बालकांच्या हक्कांची घोषणा स्वीकारण्यात आली. बालहक्कांमध्ये जीवन, ओळख, अन्न, पोषण आणि आरोग्य, विकास, शिक्षण आणि मनोरंजन, नाव आणि राष्ट्रीयत्व, कुटुंब आणि कौटुंबिक वातावरण, दुर्लक्ष, गैरवर्तन, मुलांची अवैध तस्करी इत्यादीपासून संरक्षण यांचा समावेश होतो. भारतातील मुलांची काळजी आणि संरक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी मार्च २००७मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय बाल हक्कांच्या संरक्षणासाठी एक आयोग किंवा घटनात्मक संस्था तयार केली आहे. बालहक्कांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी संस्था, सरकारी विभाग, नागरी समाज गट, स्वयंसेवी संस्था इत्यादींद्वारे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.

बाल हक्क बालमजुरी आणि बाल शोषणाला विरोध करतात. जेणेकरून त्यांना त्यांचे बालपण, जीवन आणि विकासाचा हक्क मिळू शकेल. अत्याचार, तस्करी आणि हिंसाचाराचे बळी होण्यापेक्षा मुलांचे संरक्षण आणि काळजी घेतली पाहिजे. त्यांना चांगले शिक्षण, मनोरंजन, आनंद आणि शिकायला मिळावे. बाल हक्क दिन कसा साजरा केला जातो? यानिमित्ताने विविध समाजातील लोकांमध्ये बालहक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळांकडून मुलांसाठी कला स्पर्धा आयोजित केली जाते, बालहक्कांशी संबंधित कार्यक्रम आणि अनेक प्रकारचे कविता, गायन, नृत्य, इत्यादी केले जातात. त्यांच्या गरजांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि मुलाला एक व्यक्ती म्हणून समजून घेण्यासाठी एक कार्यक्रम देखील ठेवला जातो. या कार्यक्रमातील सहभागी काही प्रश्न विचारतात. मुलांची एक व्यक्ती किंवा माणूस म्हणून ओळख असायला हवी. आनंदी आणि चांगले बालपण मिळवण्यासाठी त्यांना चांगले छप्पर, सुरक्षा, अन्न, शिक्षण,बालहक्कांचे संरक्षण सुनिश्चित कला, क्रीडा, काळजी, निरोगी कुटुंब, कपडे, मनोरंजन, वैद्यकीय दवाखाने, समुपदेशन केंद्र, वाहतूक, भविष्यातील नियोजन, नवीन तंत्रज्ञान इत्यादी उपलब्ध असणे आवश्यक आहे. कर्तव्य धारकाचा अभाव आणि बालकांच्या हक्कांचे महत्त्व याविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी, हक्क धारक आणि कर्तव्य धारक यांच्यातील संबंध दर्शविणारे कला प्रदर्शन आयोजित केले जाते. बालहक्कांची ओळख करून दिल्यानंतरही सुरू असलेल्या समस्या समजून घेण्यासाठी, बालहक्कांवर आधारित मार्गापर्यंत पोहोचण्यासाठी चर्चासत्रे आणि वादविवाद आयोजित केले जातात. बालकांचे खरे हक्क मिळवण्यासाठी बालमजुरीच्या समस्येपासून मुक्ती मिळवणे गरजेचे आहे.

बाल हक्क दिन साजरा करण्याचा उद्देश- बालकांचे हक्क आणि सन्मान सुनिश्चित करण्यासाठी भारतात दरवर्षी बाल हक्क दिन साजरा केला जातो. त्यांना पूर्ण विकास आणि सुरक्षिततेचा आनंद घेण्याची संधी द्यायला हवी. बाल हक्कांचे कायदे, नियम आणि उद्दिष्टे यांचे पालन केले जात असल्याची खात्री करावी. बालहक्क बळकट करण्यासाठी समाजाला सातत्याने काम करावे लागेल. बाल हक्क योजनेचा देशभरात प्रचार आणि प्रसार करणे. देशाच्या प्रत्येक भागातील मुलांच्या राहणीमानाचे सखोल निरीक्षण करणे. वाढत्या मुलांच्या विकासात पालकांना मदत करणे. १८ वर्षाखालील मुलांच्या जबाबदारीची पालकांना जाणीव करून देणे. दुर्बल घटकातील मुलांसाठी नवीन बाल हक्क धोरण तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे. मुलांवरील हिंसाचार, अत्याचार रोखण्यासाठी, त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी त्यांच्या सामाजिक आणि कायदेशीर अधिकारांना प्रोत्साहन देणे. देशात बाल हक्क धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या साधक आणि बाधकांचे विश्लेषण करणे. देशातील मुलांची तस्करी तसेच शारीरिक शोषणाविरुद्ध कारवाई आणि विश्लेषण करणे. बाल हक्क दिनाची गरज- हा प्रश्न आपल्या सर्वांच्या मनात निर्माण होतो की, बाल हक्क दिनाची गरज काय आहे, पण तसे नाही, त्याच्या गरजेला स्वतःचे महत्त्व आहे. बालहक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी या दिवसाची स्थापना करण्यात आली. आजच्या काळात मुलांच्या आयुष्यात दुर्लक्ष, अत्याचाराच्या घटना खूप वाढल्या आहेत. स्वार्थापोटी बालमजुरी, बाल तस्करी असे गुन्हे करायला लोक मागेपुढे पाहत नाहीत. अशा परिस्थितीत मुलांना त्यांच्या हक्कांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे जेणेकरून ते त्यांच्यासोबत होणाऱ्या कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा अत्याचाराविरुद्ध आवाज उठवू शकतील. यासोबतच बाल हक्क दिनाच्या या विशेष दिवशी शाळा, स्वयंसेवी संस्था आणि संस्थांकडून मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, जसे की भाषण स्पर्धा, कला प्रदर्शन इत्यादी. जे हा संपूर्ण दिवस आणखी खास बनवण्याचे काम करण्यासोबतच मुलांच्या बौद्धिक विकासासाठीही उपयुक्त ठरते.

!! आंतरराष्ट्रीय बालहक्क दिनाच्या समस्त बालकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्री एन. के. कुमार जी. से.नि.अध्यापक.**
**गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.**


# परिवर्तनवादी सत्यशोधक कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.अरुण बुंदेले यांची निवड

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**अमरावती । प्रतिनिधी**

२३ व्या राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनाचे सर्वोदय शिक्षण समितीद्वारा संचालित महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,हिवरखेड आणि वऱ्हाड विकासाच्या वतीने २६ व २७ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजन केले आहे.परिवर्तनवादी कवी व अभंगकार प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले यांची या २३ व्या राज्यस्तरीय सत्यशोधक महात्मा फुले साहित्य संमेलनातील परिवर्तनवादी सत्यशोधक कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आलेली आहे.त्यांच्या परिवर्तनवादी सत्यशोधक कवी संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीचा ठराव समाजभूषण प्रा.श्रीकृष्ण बनसोड यांनी बैठकीत मांडला. त्याला श्री साहेबरावजी पाटील,प्राचार्य रवींद्र वासनकर,वसंतराव तडस,पांडुरंग पाटील,वामनराव भडके,मदनलाल शर्मा,प्रकाशराव भोजने,अरविंद आमले,रमेशराव भोजने,मधुकर कवठकर,प्राचार्य श्रीमती एस.एस.दातीर तसेच वृक्ष मित्र व सामाजिक कार्यकर्ते नारायण मेंढे यांनी समर्थन दिले.

परिवर्तनवादी सत्यशोधक कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले यांचा उपेक्षित समाज महासंघाचे अध्यक्ष प्रा.श्रीकृष्ण बनसोड,कै. मौनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठान च्या सचिव श्रीमती ज्योती पदमने,सदस्य श्री भगवान बुंदेले (माजी एपीआय ),श्री गणेश बुंदेले तथा कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कार प्राप्त श्री शरद गढीकर,श्री विनोद इंगळे (अध्यक्ष,सत्यशोधक समाज समिती,अमरावती),गझलकार श्री देविलाल रौराळे विद्रोही कवी श्री प्रवीण कांबळे, श्री देवानंद पाटील तसेच वऱ्हाड विकास,डॉ.आंबेडकर समाज भूषण संघटना,महानायक संघटना,तथागत बुद्ध संघ



आणि फुले-शाहू-आंबेडकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

आजपर्यंत प्रा.अरुण बुंदेले यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,ग्रामीण दलित साहित्य संमेलनापासून तर ऑनलाईन कवी संमेलना पर्यंतच्या अनेक कवी संमेलनातील अध्यक्षपद,प्रमुख अतिथीपद भूषविले असून निमंत्रित कवी म्हणून अनेक समाजप्रबोधनपर परिवर्तनवादी काव्यरचनांचे अभिनयातून सादरीकरण केलेले आहे.ते विविध सामाजिक व साहित्यिक संस्थांचे अध्यक्ष, सदस्य असून वऱ्हाड विकास मासिकाचे सहसंपादक आहेत.प्रा.अरुण बुंदेले यांची शैक्षणिक प्रबोधन माला विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवृद्धीसाठी तर समाजातील विविध समस्यांवर प्रबोधन करणारी सामाजिक प्रबोधन माला व काव्य प्रबोधन माला सामाजिक संघटनांच्या माध्यमातून समाजासमोर ते सादर करतात. प्रा.अरुण बुंदेले यांच्या सामाजिक,शैक्षणिक व साहित्यिक कार्याचा गौरव दोन राष्ट्रीय व २२ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.२३ व्या राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनातील परिवर्तनवादी सत्यशोधक कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## प्रा.अरुण बुंदेले यांची ग्रंथसंपदा

**अभंगकार प्रा.अरुण बुंदेले यांची सामाजिक,शैक्षणिक व साहित्यिक विषयावरील निखारा व अभंग तरंग या दोन काव्यसंग्रहासह अकरा पुस्तके प्रकाशित झालेली असून चार पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.त्यांची प्रकाशित झालेली ग्रंथसंपदा : –(१) आदर्श अभ्यास – पुस्तिका, (२) भद्याचं लगीन : हुंडाविरोधी एकपात्री,(३)शकुने ! आता आपलं कसं ? (एकांकिका), (४) दारूनं मेला ओ माय (एकांकिका),(५) नळावरची झोंबाझोंबी (एकांकिका),(६)हुंडा पापाचा हंडा (एकांकिका (७)आदर्श अभ्यासाचे तंत्र (८)आदर्श मार्गदर्शिका(९)आदर्श निबंध लेखन पुस्तिका (१०)निखारा (काव्यसंग्रह (११)अभंग तरंग (काव्य संग्रह**

# दुसरबीड येथील आदर्श युवा मतदान केंद्रा वर मतदान प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



२४ सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघात एक आदर्श सखी मतदान केंद्र,एक आदर्श दिव्यांग मतदान केंद्र, सहा आदर्श युवा मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे.सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३४० मतदान केंद्रे आहेत, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदानासाठी एकूण सहा आदर्श युवा मतदान केंद्र सज्ज झाले आहे, त्यापैकी एक आदर्श युवा मतदान केंद्र हे जिल्हा परिषद दुसरबीड येथे स्थापन करण्यात आले आहे.

या मतदान केंद्राचे केंद्राध्यक्ष मतदान केंद्र असून मतदान केंद्र क्र. २५१हा आहे. या मतदान केंद्राचे केंद्राध्यक्ष श्री निवृत्ती धनगर हे असून पोल्लिंग ऑफिसर रोहन देशमुख, सुमित गोंड, अनिस निबल खान सोहल खान हे आहेत. या केंद्राचे झोनल अधिकारी म्हणून सुरज जगदाळे आणि सहायक झोनल अधिकारी म्हणून आशिष शिंदे, बी. एल. ओ. श्री साळवे काम पार पाडत आहेत सोबत प्रसार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के, सहायक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे, रमेश शिंदे तसेच पोलीस बांधव उपस्थित होते. या मतदान केंद्रावर एकूण ६१४ पुरुष आणि ५७० महिला असे मिळून एकूण ११८४ मतदार आहेत. सायंकाळी ५ वाजेपर्यंत या मतदान केंद्रावरील एकूण ७६४ लोकांनी मतदान केले आहे. मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षी लोकसभा आणि आत्ता विधानसभा या निवडणुकीला हा नाविन्य प्रयोग राबविण्यात आला आहे, एक आदर्श सखी मतदान केंद्र सिंदखेड राजा, एक आदर्श दिव्यांग मतदान केंद्र सिंदखेड राजा येथे तर सहा आदर्श युवक मतदान केंद्र अनुक्रमे सिंदखेड राजा, दुसरबीड, देऊळगाव मही, सिनगाव जहागीर आणि देऊळगाव राजा ला दोन असे मतदान केंद्र स्थापन केले आहेत.मा.निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे, मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. गटविकास अधिकारी सिंदखेड राजा राजा मुकेश महोर, मा. मुख्याधिकारी सिंदखेडराजा प्रशांत व्हटकर, मा. मुख्याधिकारी देऊळगाव राजा अरुण मोकळ,मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, मा. नायब तहसीलदार प्रवीण घोटकर,मा.नायब तहसीलदार प्रवीणकुमार वराडे ,मा. नायब तहसीलदार प्रांजल पवार, मा. नायब तहसीलदार सायली जाधव, मा. प्र. नायब तहसीलदार नितीन बढे,तसेच इतर अधिकारी काम करत आहेत.

### मराठा आरक्षण आंदोलनप्रकरणी

## संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे यांची निर्दोष मुक्तता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**




मराठा आरक्षणासाठी २९ नोव्हेंबर २०१३ रोजी सोनखेड (ता. लोहा) येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची (एसटी) बस फोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याच्या आरोपावरून संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सुभाष भगवानराव कोल्हे, उपजिल्हाध्यक्ष सूर्यकांत मारोतराव मोरे, तसेच जिल्हा संघटक माधव दतराम पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तथापि, जिल्हा व सत्र न्यायालय, कंधार यांनी या प्रकरणात पुराव्याअभावी सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. सोनखेड पोलिस ठाण्यात भारतीय दंड विधानातील कलम ३५३,३३६,३४१,४२७,१४३ तसेच सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ चे कलम ३ आणि मुंबई पोलीस कायद्याच्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. आंदोलनाच्या वेळी शासकीय वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. फिर्यादी पक्षाकडून आरोपींविरुद्ध सबळ पुरावे सादर करण्यात आले नाहीत.त्यामुळे फिर्यादी पक्षाने संशयापलीकडे जाऊन गुन्हा सिद्ध करण्यात अपयश आले. यामुळे न्यायालयाने सुभाष कोल्हे यांच्यासह इतर आरोपींना निर्दोष मुक्त केले.सदरील प्रकरणात आरोपींच्या वतीने ड. पी. बी. कदम(मंगलसांगवीकर) यांनी जोरदार युक्तिवाद सादर केला. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपींना न्यायालयाकडून दिलासा मिळाला.

या निर्णयामुळे मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या भूमिकेला न्याय मिळाला आहे, असे मत संभाजी ब्रिगेडने व्यक्त केले आहे. मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित गुन्ह्यात आलेला हा निकाल हा सामाजिक चळवळींच्या कार्यकर्त्यांसाठी एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

## कंधार तालुक्यातील मुंडेवाडी येथे विधानसभेसाठी ७०.८७ टक्के मतदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार - लोहा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरूवात झाली.५ वाजेपर्यंत मुंडेवाडी येथे विधानसभेसाठी ४६० मतदान झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

कंधार - लोहा या निवडणूकीत विजयी उमेदवार कोण ? यांचा सध्या तरी अंदाज मांडणे शक्य नाही.विधानसभा मतदारसंघात सार्वत्रिक निवडणूक होत आहे.या निवडणुकीसाठी कंधार तालुक्यातील मुंडेवाडी येथे दुपारी १ वाजेपर्यत मतदानासाठी मतदारांनी मतदान केंद्रावर सुक-सुकाट दिसून आला.

यंदाच्या वर्षी मतदानाचा टक्का वाढण्याची शक्यता वर्तविली जात असली तरी सकाळी ७ ते ९ पर्यंत एकुण ०६ मते झाली,सकाळ ११ ते दुपारी १ पर्यत २४ मतदान झाले, दुपारी १ ते दुपारी ३ वाजता २९७ दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यत ४६० मतदान झाले, ७०.८७ टक्के मतदान झाले.तर दुपारी ३ वाजेपर्यंत मतदानाच्या टक्केवारीत वाढ होऊन विधानसभेसाठी ४५.७६ टक्के मतदान झाले होते, ८८ लोहा विधानसभेत बहुरंगी लढत दिसून आली.या विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या आशाताई शिंदे यांनी शेकापकडून तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार ) गटाचे प्रताप पाटील चिखलीकर,शिवसेनेचे (उबाठा )गटाचे एकनाथ पवार चंद्रसेन पाटील जनहित लोकशाही पार्टी,प्रा.मनोहर धोंडे यांच्यात बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे,शिवकुमार नरंगले वंचित बहुजन आघाडी,सुभाष कोल्हे संभाजी ब्रिगेड पार्टी,लोहा विधानसभा मतदारसंघात १४ पैकी ८ उमेदवार अपक्ष आहेत आशा शामसुंदर शिंदे,एकनाथ जयराम पवार,पंडित वाघमारे,प्रकाश बगणुरे,बालाजी चुकूलवाड, प्रा.मनोहर धोंडे,सुरेश मोरे,संभाजी पवळे यांनी फॉर्म भरून बहुरंगी निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत, लोहा व कंधार विधानसभेचा आमदार कोण हे चित्र दि.२३ नोव्हेंबर रोज शनिवारी स्पष्ट होईल ? मुंडेवाडी येथील सायंकाळी मतदान केंद्रावर ५ च्या नंतर मतदान केंद्राबाहेर रांगाच रांगा लागल्या होत्या.

## लोहा विधानसभा मतदार संघात आतितटीची लढाई

### लोहा विधानसभा मतदारसंघात आतितटीची लढाई



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

८८ लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात ५ उमेदवारांमध्ये आतितटाईची निवडणूक झाली असून रात्री उशिरा पर्येत ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. कुठे ही अनुचित प्रकार घडला नसून मतदान शांततेत पार पडले असून ,१४ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्राणात बंद झाले आहे.

विधानसभा निवडणुक २०२४ साठी दि.२० नोव्हेंबर रोजी बुधवारी सकाळी सात वाजल्यापासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. दुपार पर्येत मतदार यांची मतदान केंद्रावर गर्दी दिसून येत नव्हती. दुपारनंतर मतदान केंद्रावर गर्दी पहाण्यात आली.

मागील पंधरा दिवस दिग्गज उमेदवारांनी आपली ताकद, प्रतिष्ठा पणाला लावून खेडो पाडी,वाडी तांड्यावर,गावा गावात जाऊन मतदार बंधूंच्या सहवासात राहून पुढील कार्यकाळात कामे करण्यासाठी व केलेल्या विकासकामांची पावती म्हणून मतदानाचा जोगवा मागताना नाकीनऊ येत होते. ग्रामस्थांना स्पिकरच्या आवाजाने विधानसभा निवडणुक आहे असे वाटू लागले. कंधार लोहा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी ( शिवसेना उबाठा) गटाचे एकनाथ दादा पवार , राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी महायुतीचे प्रतापराव पाटील चिखलीकर, शेकापच्या ( महविकास आघाडी) सौ.आशाबाई श्यामसुंदर शिंदे , वंचित बहुजन आघाडीचे शिवा भाऊ नरंगले , सेवा जनशक्ती पार्टीचे प्रा.मनोहर धोंडे सर , व चंद्रसेन ईश्वर पाटील ( जनहित लोकशाही पार्टी) यांच्यात अटीतटीची चुरस झाल्याचे दिसून येते. कंधार लोहा विधानसभा मतदारसंघात या दिग्गज उमेदवारांना आपलीं प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी जीवाचे रान करून प्रचार यंत्रणा कामाला लावली होती. २० नोव्हेंबर रोजी मतदार संघात कोणाच्या पारड्यात मताचा गठ्ठा पडला हे आज सांगताना अनेक जन आप आपल्या परीने

## स्पेन येथील परदेशी नागरिकानी भारतीय लोकशाहीतील निवडणुकीची घेतली माहिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात निवडणुकीचे पडघम वाजले असल्याने आज स्पेन येथील परदेशी पाहुण्यांना येथील निवडणुक प्रणाली ची पाहणी करून येथे माहिती घेतली स्पेन येथील परदेशी पाहुण्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथील उल्कापातातील सरोवराची पाहणी करून मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील राजे लखुजीराव जाधव यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येथे आले असता सिंदखेडराजा येथे विधानसभा निवडणुकीचे मतदान सुरू असल्याने त्यांनी भारतीय लोकशाही चे निवडणुक प्रणाली ची माहिती घेण्यासाठी येथील मतदान बुथवर जाऊन पाहणी केली यावेळी सिंदखेडराजा येथील भाजपचे कार्यकर्ते अँड संदीप मेहत्रे,उबाठा जिल्हा सह संपर्क प्रमुख छगनराव मेहेत्रे यासह अनेक मतदार हजर होते.





भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे दोन बूथ असून बुथ क्रमांक ९६ या बुथवर एकूण ८८९ मतदान झालेले आहे त्यापैकी पुरुष ४७१ महिला ४१८ बुथ क्रमांक ९७ , या बुथवर एकूण ८०२ मतदान झालेले आहे पुरुष ४४९ तर महिला ३५३ एकूण १६९१ जणांनी बजावला मतदानाचा हक्क दुसऱ्या छायाचित्रांमध्ये ९५ वर्षीय आजीने बजावला मतदानाचा हक्क.. लोकनेता न्यूज नेटवर्क राम शिंदे भोकरदन



विधानसभा मतदारसंघ ८३- किनवट वसराम तांडा, तालुका माहूर मतदान केंद्र १३ मतदारची गर्दी आणि मतदातांची लाईन लागुन,मतदान कक्षामद्य यांत्रिक आडचण आल्यामुळे काल उशिराप्रयन्त मतदान चालू होता.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904